# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १५८/२०१०/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री.सिद्राम लाचाप्पा कनगोंड,<br>मु.पो. उमदी, ता. जत, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडळ कार्यालय, सांगली | |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरुध्द पक्षकार |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. जी. सी. लेले, सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सिद्राम लाचाप्पा कनगोंड, रा. उमदी, ता. जत येथील ए.जी. क्र. १२८४ (२७०९१०३४१५३८) चे कृषी जोडणी धारक आहे. सदर ग्राहकास वीज देयके योग्य आली नाहीत म्हणून वाद आहे व त्यासाठी अंतर्गत तक्रार निवारण, सांगली यांचेकडे तक्रार नोंदविली. तथापी विहीत मुदतीत अंतर्गत कक्षाने आदेश पारित न केल्याने ग्राहकाने प्रतिनिधी मार्फत मंचात तक्रार दि. १६.७.२०१० रोजी नोंदविली.

मंचाने रितसर तक्रार नोंदवून वि.प.कडून मुद्देनिहाय अभिप्राय मागविला व त्यानंतर दि. १७.८.२०१० रोजी मंच कार्यालयात सुनावणीची तारीख निश्चित केली. वि.प.ला दि. १८.८.२०१०, १.१२.२०१०, १३.१२.२०१०, २१.१२.२०१० इ. तारखांना आवश्यक कागदपत्रे दाखल करण्यासाठी मुदत दिली. जी कागदपत्रे वि.प.ने हजर केली त्याचाी शहानिशा केली असता बऱ्याच त्रुटी आढळल्या, म्हणून पुनःश्च संधी दिली. कवठे महंकाळ विभगाचे संबंधित लेखापाल, सहाय्यक लेखापाल, कार्यकारी अभियंता, शाखाधिकारी या सर्वांना सांगूनही कागदपत्रांची पूर्तता झाली नाही. त्यामुळे उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे विलंबाने न्याय निर्णय करावा लागत आहे. बिलींग विभागाकडे अत्यंत अपुऱ्या व चुकीच्या नोंदी असल्याचे मंचास खेदाने नमूद करावे लागत आहे. महसूल जमा करणाऱ्या खात्याकडे अचूक नोंदी नसलयामुळे वि.प.चे आर्थिक नुकसान होत आहे.

प्रथम सुनावणीस नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर व कनिष्ठ अभियंता श्री. कुलकर्णी उपस्थित होते. श्री. खापरे, ग्राहक प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. मूळ तक्रार अर्ज व सोबतची कागदपत्रे व लेखी म्हणणे वि.प.ने हजर केलेले कागद व मुद्देनिहाय अभिप्राय या आधारे तक्रारीचे स्वरुप व वि.प.ची भूमिका सर्वसाधारणपणे पुढील प्रमाणे दिसून येते.

(१) श्री. कनगोंड हा कृषि वापर जोडणी धारक आहे. शासना मार्फत मार्च २००४ साली कृषि संजीवनी योजना जाहीर केली. त्या अनुसार सदर ग्राहकाने आपल्या रु. २२,०००/- पोटी रु. ६४८५/- इतकी रक्कम दि. १५.३.२००५ रोजी भरलेली आहे. तरीही त्यास कृषि संजीवनी योजनेचा लाभ मिळालेला नाही, तो मिळावा म्हणजे मार्च २००५ रोजी कांही बाकी नाही हे स्पष्ट व्हावे अशी एक मागणी आहे. तसेच कृषि स्वाभिमान योजने अंतर्गत ३ एच.पी. चा भर ८ एच.पी. इतका केल्याचे सांगून त्याप्रमाणे हॉर्स पॉवरवर आधारीत दिलेली देयके व त्यावरील दंड तसेच व्याज माफ करावे, डिसेंबर २००३ पासून ३ एच.पी. च्या वापराप्रमाणे देयक मिळावे व पूर्वीची देयके रद्द करावित, सदरची नव्याने देणारी देयके रक्कम भरण्यास चार हप्ते मिळावेत, तसेच रक्कम पूर्ण जमा झाल्यावर ' नांव ' बदलाच्या प्रस्तावास मंजुरी द्यावी इ. मागण्या नोंदविल्या आहेत.

(२) श्री. कनगोंड या ग्राहकाने भरलेली रक्कम रु. ६४८५/- चुकीच्या क्रमांकावर जमा झाल्याने सदर श्री. कनगोंड यांना कृषि संजीवनीचा लाभ मिळावा नाही. ग्राहकाकडन पावतीची खातरजमा करुन घेतलेली आहे. दुसराच क्रमांक नोंदला असल्याने सदरची चूक झाली आहे. मार्च २००३ अखेरची बाकी निरंक केलेली आहे. तसेच त्यावर लावलेले दंड व व्याज समायोजित केले आहे. तसेच कृषि स्वाभिमान योजने अंतर्गत तपासणी केली असतां, ग्राहकाने ३ एच.पी. च्या जागी ८ एच.पी. चा म्हणजेच ५ एच.पी.चा जादा वापर केल्याने रु. १८,०००/- इतका दंड केला आहे. तसेच ८ एच.पी. प्रमाणे हॉर्स पॉवरवर आधारीत बील दिले आहे. सप्टेंबर २०१० च्या बिलात पूर्वी वसूल केलेली FOCA ' फोका ' रक्कम परत केलेली आहे. त्यामुळे सर्व सवलती व समायोजन याचा विचार करतां, ग्राहकाने रु. ६४,४०५.४० इतके सप्टेंबर २०१० अखेरचे दिलेले बील भरणे आवश्यक आहे. ग्राहकाने वीजवापर केलेला आहे, त्यामुळे वीज देयके भरणे आवश्यक आहे. हप्ते मंजूर करु नयेत, तसेच नावांत बदल प्रस्ताव देयके रक्कम जमा झाल्यावर योग्य कागदपत्रे जमा झाल्यास करता येईल असे मत वि.प.ने नोंदविले आहे.सर्व कागदपत्रांच्या अभ्यासानंतर निष्कर्षासाठी पुढील मुद्दे मंचापुढे उद्भवतात.

| | |
|---|---|
| मुद्दा क्र. १ | वि.प.ने ग्राहकास मार्च २००३ पासून आजअखेरची देयके योग्य पध्दतीने दिली आहेत काय ? |
| उत्तर : | नाही, योग्य नोंदी घेवून तसचे देयक देण्याची वि.प.ची जबाबदारी आहे. |
| मुद्दा क्र. २ | तसे न झाल्यास देयके दुरुस्त करुन देण्याचा आदेश देणे योग्य आहे काय ? |
| उत्तर : | होय, देयके नोंदीप्रमाणे दुरुस्तीचा आदेश मंचास देता येईल. |
| | आदेश ? |
| | अंतिम आदेशाप्रमाणे |

कारणमिमांसा

श्री. कनगोंड हे शेतीसाठी वीज वापरणारे ग्राहक आहेत. महाराष्ट्र शासनाने कृषिधारकांच्या धारकांच्यासाठी ' कृषि संजीवनी योजना ' या मथळ्याखाली २००३ सालच्या कृषि देयके बाकी सवलत संदर्भात सदरची योजना जाहीर केलेली होती.सप्टेंबर २००३ ची बाकीमध्ये ५०% सवलत दिलेली होती. त्या संदर्भातील वि.प.चे १ ले परिपत्रक २००४ साली प्रसिध्द झाले. त्यामध्ये सदर ५०% देयक बाकी रक्कम तीन हप्त्यात भरण्याची सवलत दिली व तीच सवलत ३१ मे २००५ पर्यंत परत वाढविली. त्या अंतर्गत सदर ग्राहकास रु. ६४८५/- रकमेचे देयक दि. १७.३.२००५ रोजी दिले. सदर देयकात रु. २२,०००/- थकबाकी नोंदविली आह व कृषि संजीवनी योजने अंतर्गत भरावयाची रक्कम रु. ६४८५/- दिलेली आहे. सदर देयक ग्राहकाने सांगली जिल्हा मध्यवर्ती बँक, शाखा उमदी येथे दि. १५.३.२००५ रोजी भरल्याचे नमूद केले आहे. त्यास वि.प.ने आपल्या दि. २१.१०.२०१० च्या पत्रात दुजोरा दिला आहे. ग्राहक क्रमांक २७०४१०३४१५३८ ऐवजी २७०४१०३४१०८३ या क्रमांकवर रक्कम जमा घेतल्याने ग्राहक कृषि संजीवनी योजनेच्या लाभापासून वंचित राहिला हे खरे आहे. सदरची बाब वेळाने वि.प.च्या धान्यात आली आहे. त्यामुळे सप्टेंबर २००३ साली बाकी कांही नाही असे वि.प.ने स्पष्ट केले आहे. त्यामुळे डिसेंबर २००३ पासून ३ एच.पी. वापराचे बील नव्याने करणे योग्य आहे. कृषि स्वाभीमान योजने अंतर्गत वाढीव भार मंजूर करण्याची योजना होती. त्यासाठी प्रत्यक्षात साईटवर भेट देवून प्रत्यक्ष जोडभार व मंजूर भार या मधिल फरकाचा जादा लोड मंजूर करुन दंडात्मक कारवाई करुन सर्व कागदपत्रे जागेवरच पूर्ण करुन त्यावर ग्राहकाची सही घेण्याची आहे. त्यासंबंधी त्याचे संमत्तीपत्र, मागणीपत्र व त्यावर दिनांक, एच.पी. वाढीव भार, चाचणी अहवाल, सही इ. बाबी पूर्ण करणे आवश्यक होते, तसे सदर प्रकरणी झालेले नाही. वि.प.ने कृषि संजीवनी योजनेचे परिपत्रक व त्यानुसार मिळणारी सवलत, कालावधी इ. बाबत कागदपत्रांसह सुस्पष्ट निवेदन करणे आवश्यक होते. तसेच सदरचा लाभार्थी सवलती पासून वंचित का राहिला याची शहानिशा करुन प्राथमिक स्तरावरच प्रश्नाची निर्गत करणे योग्य होते. ग्राहकानेही वीज वापर करुनही बिलाच्या दुरुस्तीसाठी सातत्याने अट्टाहास केलेला दिसत नाही. वि.प.कडून थकबाकी वसुली संदर्भात अंतिम टप्यात कडक भूमिका घेतली गेल्याच्या शक्यतेनेच अंतर्गत तक्रार निवारण कक्षाकडे अर्ज केलेला दिसून येतो. वि.प.कडे वारंवार विचारणा करुनही कोणतेही कागद वि.प.ने हजर केलेले नाहीत. त्यामुळे रु. १८,०००/- इतका लवलेला जादा भार दंड वसुलीयोग्य नाही. दि. १५.३.२००५ रोजी रु. ६४८५/- भरलेले आहेत.

याचाच अर्थ मार्च २००५ मध्ये सदर जोडणीची बाकी निरंक झाली आहे हे ग्राहकाचे विधान चुकीचे आहे, कारण सप्टेंबर २००३ च्या थकबाकी संदर्भातील सदरची सवलत योजना आहे. मार्च २००५ ची बाकी न समजता सप्टेंबर २००३ ची थकबाकी गृहित धरली पाहिजे. त्यामुळे वि.प.ने नमूद केल्याप्रमाणे डिसेंबर २००३ ते आजअखेर ३ एच.पी.चा वापर निश्चित करुन तसेच नव्याने बील देणे योग्य आहे. डिसेंबर २००३ ते आजअखेर रु. ६४८५/- व्यतिरिक्त इतर जमा रक्कम असल्यास देणाऱ्या देयकातून वजा करावी, तसेच FOCA 'फोका' रकमेची शहानिशाकरावी व त्याप्रमाणे अंमल करावा.

सदर प्रकरणी वारंवार सांगूनही वि.प.ने आवश्यक कागदपत्रे मंचासमोर दाखल केलेली नाहीत. त्यामुळे हजर कागदपत्राच्या आधारेच मंचास न्याय निर्णय करावा लागला आहे. बिलींग युनिट मधिल रेकॉर्ड किपींग मधिल हेळसांडीमुळेच अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

ग्राहकास डिसेंबर २००३ ते आजअखेर ३ एच.पी. वापराप्रमाणे नव्याने बील करुन देवून हिशोब समजावून सांगावा. सदर प्रकरणाची एक प्रत मंचास सादर करावी. तसेच यापूर्वी दिलेली सर्व बीले रद्द करावी. बिलामध्ये दंड अगर व्याज लावू नये, कारण वि.प. ग्राहकास योग्य रकमेचे बील देण्यास असमर्थ आहे. FOCA 'फोका' रकमेचा स्वतंत्र चार्ट करुन देयकात फरक दाखवावा, या उपर कोणत्याही प्रकारच वेगळी रक्कम वसुलीयोग्य असणार नाही. नव्याने दिलेले बील ग्राहकाने जमा केल्यावर नावांत बदलाचा प्रस्ताव विनियमातील तरतुदीप्रमाणे मंजूर करावा असे मंचाचे मत आहे.

## आदेश

१) डिसेंबर२००३ ते आजअखेरचे ३ एच.पी. वापराप्रमाणे हॉर्स पॉवरवर आधारीत बील देण्यात यावे.

२) यापूर्वी म्हणजेच डिसेंबर २००३ नंतर दिलेली सर्व देयके रद्द करावीत.

३) नव्याने देण्यात येणाऱ्या देयकात कोणत्याही प्रकारचा दंड, व्याज लावू नये.

४) ग्राहकास सर्व हिशोब समजावून सांगावा व त्याची एक प्रत मंचास पाठवावी.

५) FOCA 'फोका' चा स्वतंत्र हिशोब करावा, त्याचा अंमल नवीन देयकात करण्यास परवानगी आहे.

६) देयकाची रक्कम जमा झाल्यावर नावांतील बदल प्रस्तावानुसार (तरतुदीनुसार) मंजूर करावा.

७) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६  ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

८) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बाद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष :

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.